सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

दूरध्वनी : ०२२ ६९४०३३३३ ई.मेल :collector.mumbaisuburb@maharashtra.gov.in

**तक्रार क्र.२३०**

क्र.:सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-२४८, ३८०,४६३/२०२३

दिनांक : 09 /08/२०२३ 18734

**प्रति,**

सदस्य सचिव,

कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई,

३०२, वेक फिल्ड हाऊस, ३रा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंटजवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

**विषय** : Encroachment happening on the mangroves in Charkop Sector ८ behind Sun rise building ...
**(तक्रारदार- श्री.राहुल एम.)**

**संदर्भ** : १. आपलेकडील पत्र क्र.जा.क्र.ल.ले./कां.स./२४/सन २०२३-२४, दि.२७/०४/२०२३ रोजीचे पत्रासोबत श्री.राहुल एम. यांचा दि.१४/०४/२०२३ रोजीचा ई-मेल अर्ज.
२.उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल पत्र क्र.उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-४१०/२०२३, दि.१९/०७/२०२३.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये श्री.राहूल एम. यांचा तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असून अर्जदार यांनी अर्जदार श्री. राहूल एम. यांनी मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील चारकोप सेक्टर ८ सनराईज इमारतीच्यामागे कांदळवन क्षेत्रात अतिक्रमण होत असल्याबाबत तक्रार दाखल केलेली आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाकडून कळविलेनूसार, उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी संदर्भ क्र.२ अन्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता पुढीलप्रमाणे माहिती सादर करणेत येत आहे.

प्रकरणी मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील स. नं. ३९, न. भू. क्र. ४ या भूखंडाची दि. १७/०५/२०२३ रोजी वनपरीक्षेत्र अधिकारी, मुं. का. सं. घ, पश्चिम मुंबई यांनी मंडळ अधिकारी, बोरीवली व तलाठी सझा कांदिवली यांचे समवेत स्थळपहाणी केली असता, सदर तक्रारीत नमुद ठिकाण हे अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. परंतू, सदरचे क्षेत्र हे कांदळवनापासून ५० मीटरचे आत येत आहे. सदर मिळकतीवर कांदळवनालगत अंदाजे २० ते २५ कच्चा स्वरूपच्या झोपड्या आहेत. जागेवर स्थळपहाणी दरम्यान कोठेही कांदळवनाची तोड नाही किंवा नव्याने भरणी झाल्याचे दिसून आलेले नाही. त्याअनुषंगाने मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील स. न. ३९, न. भू. क्र. ४ या शासकीय मिळकतीवर कांदळवनपासून ५० मीटर चे आत (बफर झोन) मध्ये अतिक्रमण करून झोपड्यांचे बांधकाम केल्याने मंडळ अधिकारी, बोरीवली यांनी चारकोप पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र.०२५९, दि.३०/०६/२०२३ अन्वये सुनील लालजी वर्मा व इतर १२ यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, असे नमूद केले आहे.

उपरोक्तप्रमाणे आपले माहिती व पूढील कार्यवाहीसाठी सविनय सादर करणेत येत आहे.

Jadhav

(डॉ. अरुणा जाधव)

**अपर तहसिलदार (महसूल),**

**मुंबई उपनगर जिल्हा**

**स्थळ प्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची सही आहे.**

वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 117
दिनांक 17/08/2023
Mangrove Comm
AD
Anitta Patil

D:\Backup 2\01.01.2023\Complaints\Borivali\248 श्री. राहूल एम, तक्रार क्र.230 APCCF Ref..docx

'w2S-463
20/07/23

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

**प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१**

दूरध्वनी क्र. ०२२-२६५१०१३६ ईमेल- sdomsdest@gmail.com

तक्रार क्र २३०

क्रमांक : उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि- ४१० /२०२३
दिनांक : १८/०७/२०२३

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

**विषय** : Encroachment happening on the mangroves in Charkop Sector-८ behind Sun Rise building....
**राहूल मोरे यांचा तक्रार अर्ज**

**संदर्भ** : १) आपलेकडील पत्र क्र. पत्र क्र. सी/कार्या-२आय / कांदळवन/कावि-२४८ / २३, दि. २८/०४/२०२३
२) वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचेडील पत्र क्र. जा. क्र. अ.पश्चिम मुंबई/बोरी.तक्रा./४४८/२०२३-२३, बोरीवली, दि. ०३/०७/२०२३
३) तहसीलदार बोरीवली यांचेकडील पत्र क्र. तह/बोरी/टे-२/कांदळवन-हास /२०२३, दि. ०७/०७/२०२३

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी आपल्याकडील संदर्भीय क्र. १ अन्वये प्राप्त झालेला तक्रारदार श्री. राहूल मोरे यांनी मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील चाकोप सेक्टर-८ सनराईज इमारतीच्यामागे कांदळवन क्षेत्रात अतिक्रमण होत असलेबाबत तक्रार केली आहे. सदर तक्रार पुढील कार्यवाहीसाठी सदर तक्रार पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदार बोरीवली व वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांनी संदर्भीय पत्र क्र. २ व ३ अन्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील स. नं. ३९, न. भू. क्र. ४ या भूखंडाची दि. १७/०५/२०२३ रोजी वनपरीक्षेत्र अधिकारी, मुं. का. सं. घ, पश्चिम मुंबई यांनी मंडळ अधिकारी, बोरीवली व तलाठी सझा कांदिवली यांचे समेव स्थळपहाणी करून अहवाल सादर केला आहे. सदर तक्रारीत नमुद ठिकाण हे अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. परंतू कांदळवनापासून ५० मीटरचे आत येत आहे. असे नमूद आहे. सदर मिळकतीवर कांदळवनालगत अंदाजे २० ते २५ कच्चा स्वरूपच्या झोपड्या आहेत. जागेवर स्थळपहाणी दरम्यान कोठेही कांदळवनाची तोड नाही किंवा नव्याने भरणी झाल्याचे दिसून आलेले नाही.

त्याअनुषंगाने तहसीलदार बोरीवली यांनी मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील स. न. ३९, न. भू. क्र. ४ या शासकीय मिळकतीवर कांदळवनपासून ५० मीटर चे आत (बफर झोन) मध्ये अतिक्रमण करून झोपड्यांचे बांधकाम केल्याने मंडळ अधिकारी, बोरीवली यांनी चारकोप पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. ०२५९, दि. ३०/०६/२०२३ अन्वये सुनील लालजी वर्मा व इतर १२ यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर अहवाल सविनय सादर

(डॉ. भागवत गावंडे)
**उपविभागीय अधिकारी,**
**मुंबई पश्चिम उपनगर**

CS CamScanner

महाराष्ट्र शासन

# तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय

डॉ. न. रा. करोडे मार्ग, नाटकवाला लेन, एस. व्ही. रोड, बोरीवली (प.), मुंबई-४०००९२.
दूरध्वनी क्र. २८०७५०३४
ई-मेल :-tahsildarborivli11@gmail.com

कांदळवन

क्रमांक :-तह/बोरी/टे-२/कांदळवन -हास/२०२३.
दिनांक ०३/०७/२०२३

प्रति,
मा. उपविभागीय अधिकारी,
मुंबई पश्चिम उपनगर

विषय :-कांदळवन -हासाबाबत.
Encroachment happening on the mangroves. in Charkop Sector ८ behind Sun rise building
श्री. राहूल मोरे

संदर्भ :- १) मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडील पत्र क्र. सी/कार्या-२ आय/कांदळवन/कावि-२४८/२०२३ दि. २८/०४/२०२३
२) वन परिक्षेत्र अधिकारी, मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र जा. क्र. अ. पश्चिम मुंबई/बोरी/तक्रा./३२३/२०२३-२४ दि. २५/०५/२०२३ प्राप्त दि. २८/०६/२०२३.
३) या कार्यालयाचे मंडळ अधिकारी बोरीवली यांना गुन्हा नोंद बाबत पत्र क्र. तह/बोरी/टे-२/कांदळवन -हास/२०२३ दि. २८/०६/२०२३.
४) मंडळ अधिकारी, बोरीवली यांचा अहवाल बा.क्र. १७२ व २१६/मंअबो/FIR/२०२३ दि. ०१/०७/२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील संदर्भिय पत्रासोबत प्राप्त अर्जदार, श्री. राहूल मोरे यांनी मौजे-चारकोप, ता. बोरीवली स.क्र. सेक्टर-८, सनराईज बिल्डींगच्या मागे, कांदळवन क्षेत्रात अतिक्रमण होत असलेबाबत तक्रार दाखल केली आहे.

त्याअनुषंगाने मौजे-चारकोप, ता. बोरीवली येथील स.नं. ३९, न.भू.क्र. ४ या भूखंडाची दि. १७/०५/२०२३ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई यांनी मंडळ अधिकारी, बोरीवली व तलाठी साझा कांदिवली यांचे समवेत स्थळपाहणी करून संदर्भिय क्र. २ चे पत्रान्वये दि. ०६/०७/२०२३ रोजी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अहवालात अ.क्र. १५ नुसार त्यांनी तक्रारीतील नमूद ठिकाण हे अधिसुचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. परंतु, कांदळवनापासून ५० मीटरचे आत येत आहे असे नमूद केले आहे.

त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भिय क्र. ३ चे पत्रान्वये मौजे-चारकोप, ता. बोरीवली येथील स.नं. ३९, न.भू.क्र. ४ या शासकीय मिळकतीवर कांदळवनाचा -हास केलेबाबत संबंधीतांवर गुन्हा नोंद करणेबाबत कळविण्यात आले होते.

10.07.2023

लिपिक

उपविभागीय अधिकारी
मुंबई पश्चिम उपनगर

D:\Kandalvan\2023\...Encroachment happening on the mangroves in Charkop Sector 8 behind Sun rise building...docx

त्याअनुषंगाने मंडळ अधिकारी बोरीवली यांनी चारकोप पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. दि. ३०/०६/२०२३ अन्वये सुनील लालजी वर्मा व इतर १२ यांचेवर गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. सोबत F.I. प्रत सादर करण्यात येत आहे. अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

(सुरेश चप्पलवार)
तहसीलदार बोरीवली

प्रत :- मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

10/07/23
महसूल सहायक
जिल्हाधिकारी कार्यालय
मुंबई उपनगर जिल्हा

CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

District (जिल्हा): बृहनमुंबई शहर     P.S.(ठाणे): चारकोप     Year (वर्ष): 2023
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0259     Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 30/06/2023 22:42 बजे

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ | १५(१) |
| 2 | पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ | १५(२) |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
1. Day(दिवस): गुरूवार     Date From (दिनांक पासून): 16/02/2023
Time Period (कालावधी): पहर 1     Date To (दिनांक पर्यंत): 16/02/2023
Time From (वेळेपासून): 00:00 बजे
Time To (वेळेपर्यंत): 00:00 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक): 30/06/2023     Time (वेळ): 19:50 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ
Entry No. (नोंद क्र.): 037     Date & Time (दिनांक आणि वेळ): 30/06/2023 22:17 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): Oral
5. Place of Occurrence (घटनास्थळ):
1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 1.5 किमी
Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): नमूक्र 4,मौजे-चारकोप ,ता-बोरिवली ,सर्वे क्र39

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):
(a) Name (नाव): विशाल सुभाष गायकवाड
(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):     (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत
(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1987
(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):     Date of Issue (दिल्याची तारीख):
(f) Passport No.(पारपत्र क्र.):
Place of Issue (दिल्याचे ठिंकाण):
(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. क्र.) | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | B/3/6,रूम न-03,सेक्टर-15,शबरी हॉटेल समोर,सरदार कपाऊंड,वाशी नवि मुंबई, मुंबई,महाराष्ट्र,400702,भारत |
| 2 | स्थायी पता | B/3/6,रूम न-03,सेक्टर-15,शबरी हॉटेल समोर,सरदार कपाऊंड,वाशी नवि मुंबई, मुंबई,महाराष्ट्र,400702,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-770959975

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/ आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्त |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल लालजी वर्मा | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चा बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | महेद्र दिनानाथ यादव | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चा बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | शब्बू यादव | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चा बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 4 | लवकुश राजबहादूर प्रजापती | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चा बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 5 | कैलास बाबुराव गायकवाड | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चा बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 6 | हरेद्र दुधनाथ शर्मा | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चाल बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 7 | नदा दिली जतकर | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई ,चाल बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 8 | दिलीप तुकाराम विनकर | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चारको बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 9 | सुलाबाई खडू काळे | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चारको बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 10 | विलास विठ्ठल इवळे | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चारकोप बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 11 | मनोज भडारी | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चारकोप बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 12 | सुनिल कुंडलिक खाडे | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चारकोप बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 13 | जमुना महाले व त्यांच्या आजूबाज | | | 1. चारकोप कांदिवली प मुबई,चारकोप बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|



CS CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
## प्रथम खबर अहवाल
## (कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): बृहनमुंबई शहर    P.S.(ठाणे): चारकोप    Year (वर्ष): 2023
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0259    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 30/06/2023 22:42 वाजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ | १५(१) |
| 2 | पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ | १५(२) |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
1. Day(दिवस): गुरूवार
Time Period (कालावधी): पहर 1
Date From (दिनांक पासून): 16/02/2023
Date To ( दिनांक पर्यंत): 16/02/2023
Time From (वेळेपासून): 00:00 वाजे
Time To (वेळेपर्यंत): 00:00 वाजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक ): 30/06/2023    Time (वेळ): 19:50 वाजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ
Entry No. (नोंद क्र.): 037    Date & Time (दिनांक आणि वेळ): 30/06/2023 22:17 वाजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): Oral

5. Place of Occurrence (घटनास्थळ):
1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 1.5 किमी
(b) Address (पत्ता): नभूक्र 4,मौजे-चारकोप ,ता-बोरिवली ,सर्वे क्र39    Beat No. (बिट क्र.):
(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):
(a) Name (नाव): विशाल सुभाष गायकवाड
(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :
(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1987    (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत
(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):
(f) Passport No.(पारपत्र क्र.):    Date of Issue (दिल्याची तारीख):
Place of Issue (दिल्याचे ठिकाण):
(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



CS CamScanner

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | B/3/6,रूम नं-03,सेक्टर-15,शबरी हॉटेल समोर,सरदार कंपाऊंड,वाशी नवि मुंबई ,वाशी,नवी मुंबई,महाराष्ट्र,400702,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | B/3/6,रूम नं-03,सेक्टर-15,शबरी हॉटेल समोर,सरदार कंपाऊंड,वाशी नवि मुंबई ,वाशी,नवी मुंबई,महाराष्ट्र,400702,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-7709599752

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल लालजी वर्मा | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | महेंद्र दिनानाथ यादव | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | शब्बू यादव | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 4 | लवकुश राजबहादूर प्रजापती | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 5 | कैलास बाबुराव गायकवाड | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 6 | हरेंद्र दुधनाथ शर्मा | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 7 | नंदा दिली जतकर | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई ,चारकोप बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 8 | दिलीप तुकाराम विनकर | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 9 | सुलाबाई खंडू काळे | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 10 | विलास विठ्ठल इवळे | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 11 | मनोज भंडारी | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 12 | सुनिल कुंडलिक खाडे | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 13 | जमुना महाले व त्यांच्या आजूबाज | | | 1. चारकोप कांदिवली प मुंबई,चारकोप, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|



CamScanner

Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मूल्य (रु. मध्ये)):

Inquest Report / U.D. case No., If any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

श्री विशाल सुभाष गायकवाड वय36वर्षे नोकरी मंडश अधिकारी , बोरीवली राहणार बी/3/06/रुम नं3सेक्टर 15सरदार कंम्पाउंड , शबरी हॉटेल्या समोर वाशी नवी मुंबई 400703 मो.क्र7709597952. मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्यावर मागील 04 वर्षापासुन राहण्यास आहे ,माझा सर्व परिवार माझा मुळ गाव नाशिक या ठिकाणी आहे .मी मंडळ अधिकारी या पदावर मा. तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी , बोरीवली मुंबई या कार्यालयात कार्यरत आहे , मी महाराष्ट्र जमिन महसुल वसुली अधिनियम 1966अंतर्गत नमुद केलेली सर्व कार्य व कर्तव्य प्रामुख्याने महसुन विभागाची महसुल वसुली करणे ,शासकीय जमीनीवर अनधिकृत बांधकामे तसेच अतिक्रमण शोधुन त्यांचे अहवाल वरिष्ठाकडेसादर करणे , तसेच तलाठी व कोतवाल याच्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे अशा प्रकारची कामे पार पाडीत असतो . तसेच मी कांदळवण संदर्भात आलेल्या तक्रारीबाबत सरकार तर्फे फिर्याद देउन गुन्हे दाखल करण्याचे काम करतो. आज रोजी कांदळवन - संवर्धनाबाबत श्री राहुल मोरे यांनी केलेल्या तक्रारीबाबत सरकार तर्फे फिर्याद देऊन गुन्हे दाखल करण्याचे काम करतो. चारकोप पोलीस ठाणे हद्दीतील सर्वे क्र39न भु क्र 04या शासकीय जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत तक्रार श्री राहुल गोरे यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी , कांदळवन संधारण घटक पश्चिम मुंबई कार्यालयास केली आहे. श्री राहुल मोरे यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 17/05/2023रोजी मौजे चारकोप , तालुका बोरीवली येथील सर्वे क्र 39 न.भु क्र04 शासकीय जमीनीवर संयुक्त स्थळ पाहणी वन विभाग व आमच्य कार्यालया कडून करण्यात आली ,सदर पाहणी दरम्यान सदर मिळतीवर कांदळवन परिसरा लगत एकुण 20 ते25कच्च्या झोपड्याचे बांधकाम आढळुन आले ,सदर जागेचे वनपाल बोरीवली यांनी जी. पी. एस रांडींग घेतसे असता ते 1)N 19142:85E72403.22 2)N 19124.42.E 724902.87 असे आहे सदर वेळी तलाठी व वनपाल बोरीवली हे देखील उपस्थित होते , तक्रार श्री राहुल मोरे यांना वनपाल बोरीवली यांनी कळविले असता .ते सदर पाहणी दरम्यान उपस्थित राहिले नाहीत , सदर जागेची पंचनाम दोन:पंचा समक्ष त्यांच दिनांकीत करण्यात आला होता. सदर शासकीय जमीनीवर अनधिकृत बांधकाम करणा-या व्यक्ति विर्द्ध गुन्हा दाखल करण्यासाठी क्रमांक तह/बोरी/टे-/कांदळ्वन - कावि/2023दिनांक28/06/2023रोजी अन्वये मा. तहसीलदार बोरीवली सो यांनी माझी प्राधिकृत अधिकारी म्हणुन नेमणुक केली आहे ,सदर आदेशाच्या अधिन राहुन मी . आज रोजी चारकोप पोलीस ठाणे वर प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल करण्यासाठी हजर झालो . दिनांक 17/05/23 रोजी करण्यात आलेल्या पंचनाम्यामध्ये शासकीय जमीनीवर अनधिकृत अतिक्रमण करण्यात व्यक्तिची नावे नमुद नव्हती .म्हणुन आज रोजी पुन्हा तलाठी सजा कांदिवली . चारकोप पोलीस ठाणेचे पोलीस निरिक्षक व कर्मचारी व कर्मचारी व कर्मचारी सदर ठिकाणी जाऊन सदर शासकीय जागेची पाहणी करुन दोन पंचा समक्ष पंचनामा करण्यात आला . सदर ठिकाणी अतिक्रमण झालेले दिसुन आले असुन त्या अतिक्रमितांची नावे खालील नमुद प्रमाणे आहेत.1) सुनिल लालजी वर्मा वय40वर्षे2) महेद्र दिनानाथ यादव वय45वर्षे 3) शब्बु यादव वय60वर्षे 4) लवकुश राजबहादुर प्रजापती वय25वर्षे 5) कौलास बाबुराव गायकवाड वय 45वर्षे 6) हरेंद्र दुधनाथ शर्मा 7) नंदा दिलीप जतकर वय51वर्षे 8)दिलीप तुकाराम विनकर वय-60वर्षे 9)सुलाबाई खंडू काळे वय-48 वर्षे 10) विलास विठ्ठल इवळे वय-52वर्षे 11)मनोज भंडारी,12)सुनिल कुंडलिक खाडे वय-28वर्षे 13)जमुना महाले व त्यांच्या आजूबाजूस राहणारे इतर झोपडी धारक या व्यक्तींनी कांदळवनापासून 50मिटरच्या आत जागेव अनधिकृत कच्च्या झोपड्यांचे बांधकाम केले आहे.त्यामुळे कांदळवनाच्या संदर्भात असलेल्या तरतूदीचे उल्लंघन झाल्याचे दिसून येत आहे. याबाबत मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.3246/2004रूपांतरित जनहित यांचिका क्र. 86/2006दि.06/10/2005 मा.न्यायालयाने कांदळवनापासून 50मिटरच्या आत कोणतेहि विकास काम करू नये असे आदेशित केले आहे. सबब मा.उच्च न्यायालयाने आदेशाचा भंग झालेला आहे.नमूद जागेचा व परिस्थितीचा दोन पंचांसमक्ष पंचनामा करण्यात आलेला आहे.तरि दि. 16/02/2023रोजीच्या पुर्वी मौजे चारकोप ता.बोरिवली ,येथील सर्वे क्र.39 न.भू.क्र.4या शासकिय मिळकतीवर कच्च्या झोपड्यांचे बांधकाम 1) सुनिल लालजी वर्मा वय40वर्षे2) महेद्र दिनानाथ यादव वय45वर्षे 3) शब्बु यादव वय60वर्षे 4) लवकुश राजबहादुर प्रजापती वय25वर्षे 5) कौलास बाबुराव गायकवाड वय 45वर्षे 6) हरेंद्र दुधनाथ शर्मा 7) नंदा दिलीप जतकर वय51वर्षे 8)दिलीप तुकाराम विनकर वय-60वर्षे 9) सुलाबाई खंडू काळे वय-48 वर्षे 10) विलास विठ्ठल इवळे वय-52वर्षे 11)मनोज भंडारी,12)सुनिल कुंडलिक खाडे वय-28वर्षे 13)जमुना महाले व त्यांच्या आजूबाजूस राहणारे इतर झोपडी धारकांनी केले असून सदर झोपडी धारकांविरूद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 कलम 15(1)(2)अन्वये कायदेशिर कारवाई होण्यास विनंती आहे.माझा जबाब संगणकावर मराठित टंकलिखीत केला असून तो मी वाजून पाहिला असात तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

13.Action (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at or (किंवा)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Sagar Ravsaheb Argade
Rank (पद): SI (Sub-Inspector)
No.(क्र.): DGPSRAM9301 to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



CS CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb Impression of the complainant / Informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची सही)

**Name (नाव):** Manohar Ramchandra S
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMAH66090

महाराष्ट्र शासन
वनविभाग

# वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचे कार्यालय

Email Id:
rfomangrovewm@gmail.com

स. न. १४७ पंचम सोसायटीजवळ, गोखले महाविद्यालय मार्ग,गोराई, बोरीवली (प.) ४०० ०९१

सुधारीत अहवाल जा.क्र. अ.पश्चिम मुंबई/बोरी. तक्रा./448/2023-24 बोरीवली दि : 03/07/2023

प्रति,
मा. अध्यक्ष
तालुकास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती
तथा उपविभागीय अधिकारी प. उपनगरे

**विषय :** Encrochment happening on the mangroves in Charkop Sector 8 behind Sun Rise building (तक्रार क्र. 230)

**संदर्भ :** 1) मा. विभागीय वनअधिकारी मुं.कां.सं.घ कुर्ला यांचेकडील जा.क्र. /231/2023-24 दि. 28/04/2023

2) मा. सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण च संवर्धन समिती तथा सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई यांचे कडील जा.क्र.सवसं/कांसंमुं/86/2023-24 दि. 05/05/2023

3) आपले कडील पत्र क्र. उविअ/मुंपउ/कार्या-5/कावि-410/2023 दि. 22/05/2023

4) वनपाल बोरीवली यांचे कडील पत्र जा.क्र.अ.तक्रार/65/2023-24 दि. 23/05/2023

5) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.अ.प.मुंबई.बोरी.तक्रा/323/2023-24 दि. 25/05/2023

6) मा. विभागीय वनअधिकारी यांचे कार्यालयाकडील भ्रमणध्वनी वरील संदेश.

7) मा. विभागीय वनअधिकारी यांचेकडील जा.क्र.कक्ष-9/जमिन/2747/2022-23 दि. 21/12/2022

**मुळ तक्रारदार :** श्री. राहुल मोरे

महोदय,

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकित प्रकरणी श्री. राहुल मोरे यांचा मौजे चारकोप स.क्रं : 39 न.भु.क्र. 4 मधील तक्रार अर्जाबाबतचा मुद्देनिहाय अहवाल सादर करीत आहे तो खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| **1) स्थळाचे वर्णन :** | मौजे चारकोप, लक्ष्मीनगर, स.क्रं : 39 न.भु.क्र. 4 |
| **2) तक्रारीचा तपशील :** | वरीलप्रमाणे विषयाप्रमाणे |
| **3) चौकशी करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम :** | श्री. महेंद्र गिते वनपाल बोरीवली<br>श्री. वी. कांरडे मंडळ अधिकारी बोरीवली |

CS CamScanner

| | |
|---|---|
| | श्री. गणेश लोहार तलाठी कांदिवली<br>परीरक्षण भुमापक |
| 4) स्थळाचे जी.पी.एस.रिडिंग - | 1) N 19 12 42.85 E 72 49 03.22<br>2) N 19 12 43.42 E 72 49 02.87 |
| 5) Geo Tag Photo - | सोबत जोडले आहेत. |
| 6) स्थळपंचनामा - | सोबत जोडला आहे. |
| 7) तक्रार क्षेत्राचा वैधानिक दर्जा- | |
| अ) तक्रारीत नमुद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र आहे का? असल्यास अधिसुचना क्र. | नाही |
| ब) सदरचे क्षेत्र वनविभागाच्या ताब्यात आहे किंवा नाही? | सदरचे क्षेत्र संरक्षणाच्या दृष्टीने 50 मीटर मधील क्षेत्र वनविभगाच्या ताब्यात देण्यात आले होते, परंतु संदर्भ क्र. 7 अन्वये सदर क्षेत्राचा ताबा परत महसुल विभागाकडे घेण्याबाबतचे पत्र मा. विभागीय वनअधिकारी मुं.कां.सं.घ कुर्ला यांचे मार्फत मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सादर करण्यात आलेले आहे. |
| क) सदरचे क्षेत्र बफर झोन मध्ये येते का? असल्यास अंतर (मी.) | होय |
| ड) सदरचे क्षेत्र खासगी कांदळवन क्षेत्र आहे का ? | नाही |
| ई) सदरचे क्षेत्र सरकारी क्षेत्र आहे का? | नाही |
| 8) सन ३१ डिसेंबर २००५ रोजी MRSAC Map नुसार नमुद जागेवर कांदळवन होते का ? | MRSAC नकाशानुसार सन 2005 साली खाजण क्षेत्र आहे. |
| 9) सदरचा अतिक्रमण/भरणी सन 2005 च्या आधी किंवा नंतर करण्यात आले आहे किंवा कसे ? | ------------------ |
| 10) कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे का ? | नाही |
| 11) सद्यस्थितीत नमुद जागेवर कांदळवन आहे किंवा कसे याबाबत सुस्पष्ट अभिप्राय: | नाही |
| 12) अधिसुचित कांदळवन क्षेत्र असल्यास प्रथम गुन्हा नोंद केला आहे का? | नाही |
| 13) अधिसुचित कांदळवन क्षेत्रा व्यतिरिक्त क्षेत्र असल्यास संबंधित यंत्रणेस लेखी कळविण्यात आले आहे का? | या पत्राद्वारे कळविण्यात येत आहे. |
| 14) कोणत्या विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे? | पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 अन्वये प्राधिकृत अधिकारी |

CS CamScanner

| | |
|---|---|
| 15) वनक्षेत्रपाल यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीचा स्वयंस्पष्ट अभिप्राय - | तक्रारीतील नमुद ठिकाण हे अधिसुचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. परंतु जी.पी.एस क्र. 2 चे ठिकाण अधिसुचित राखीव कांदवनापासून 50 मी. च्या आत येत आहे व जी.पी.एस क्र. 1 चे ठिकाण हे नव्याने उगवलेल्या कांदळवनपासून 50 मी. च्या आत येत आहे. MRSAC नकाशानुसार सन 2005 साली जी.पी.एस क्र. 2 च्या ठिकाणी खाजण क्षेत्र आहे, व सदयस्थितीत दोन्ही ठिकाणी कांदळवन नाही.<br>सदरचे क्षेत्र हे मौजे चारकोप सर्वे क्र. 39, न.भु.क्र 4 या शासकिय मिळकतीपैकी आहे. सदरचे क्षेत्र कांदळवनापासुन 50 मीटर मधील क्षेत्र संरक्षणाच्या दृष्टीने या विभागाच्या ताब्यात देण्यात आले होते परंतू संदर्भ क्र. 7 अन्वये सदर क्षेत्राचा ताबा परत महसुल विभागाकडे घेण्याबाबतचे पत्र मा. विभागीय वनअधिकारी मुं.कां.सं.घ कुर्ला यांचे मार्फत मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सादर करण्यात आलेले आहे. सदर मिळकतीवर कांदळवनालगत अंदाजे 20 ते 25 कच्या स्वरुपाच्या झोपड्या आहेत. सदर जागेवर स्थळपाहणी दरम्यान कोठेही कांदळवनाची तोड किंवा नव्याने भरणी झाल्याचे दिसुन आले नाही. |

सोबत : पंचनामा, नकाशा, जिओ टॅग फोटो, संदर्भ क्र. 7 चे पत्र

(एस.के.खुणे)
सदस्य सचिव
तालुकास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन
सनियंत्रण समिती तथा वनपरीक्षेत्र अधिकारी,
मुं.कां.सं.घ. पश्चिम मुंबई.

प्रतिलीपी : 1) मा. विभागीय वनअधिकारी मुं.कां.सं.घ कुर्ला, यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय साद.

2) मा. सदस्य सचिव जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा सहाय्यक वनसंरक्षक कांदळवन संरक्षण मुंबई यांना माहिती पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

3) मा. सहा. आयुक्त बृहन्मुंबई महानगर पालिका आर/~~मध्य~~ पश्चिम यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

4) तहसीलदार बोरीवली यांना माहिती व पुढील कार्यवाहिसाठी सादर.

प्रत : श्री. राहुल मोरे यांना माहितीसाठी सादर.
rahulmore@hotmail.com 9930900765

CamScanner

महाराष्ट्र शासन
वनविभाग
विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक
यांचे कार्यालय
प-६८, कामगार नगर, टिळकनगर स्टेशन जवळ, कुर्ला (पूर्व), मुंबई ४०००२४

दूरध्वनीक्र.022-25220097
EmailId:dfommcu@gmail.com

दिनांक. 22/12/2022.

जा.क्र. कक्ष-9/जमिन/2747/2022-23

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर.

विषय — मौजे चारकोप, तालुका- बोरीवली सर्वे क्रमांक- 39 लक्ष्मीनगर येथील कांदळवन क्षेत्रापासुन 50 मीटरच्या आत असलेल्या क्षेत्राचा ताबा परत महसुल विभागाकडे देण्याबाबत.

संदर्भ:
1. पर्यावरण आणि हवामान बदल विभाग, महाराष्ट्र शासनाकडील पत्र क्र. MCZMA-2016/CR-23/TC-4, दिनांक.07/04/2016.
2. पर्यावरण आणि हवामान बदल विभाग, महाराष्ट्र शासनाकडील पत्र क्र. MCZMA-2016/CR-23/TC-4 (part II), दिनांक. 14/02/2021.
3. मा.पर्यावरण मंत्री, श्री. प्रकाश जावडेकर यांचेकडील पत्र क्र. 2/5/2021- IA.III, दिनांक.30/03/2021.
4. मा.पर्यावरण मंत्री, श्री. भूपेन्द्र यादव यांचेकडील पत्र क्र. 2/5/2021- IA.III, दिनांक.23/02/2022.
5. वनक्षेत्रपाल पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र क्र. प.मुंबई/148, दिनांक.18/05/2021.
6. मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष,मुंबई यांचेकडील पत्र क्र. अप्रमुवसं/कांक/सर्वे/न.क्र- जि-LAQ-90/2032, दिनांक.22/12/2022.

मौजे चारकोप ता.बोरीवली स.क्र.39 लक्ष्मीनगर येथील अस्तित्वात असलेल्या कांदळवन क्षेत्रापासुन 50 मीटरच्या आत असलेल्या अंदाजे 200 निवासी-अनिवासी बांधकामे / झोपडयांचे महसुल व इतर विभांगामार्फत संयुक्त रित्या कारवाई व्दारे दिनांक 09/04/2021 रोजी अतिक्रमण निष्कासन करुन सदर क्षेत्राचे अतिक्रमणापासुन संरक्षण करणेकरीता तहसिलदार बोरीवली, नगर भुमापन अधिकारी बोरीवली, अपर जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व उपविभागीय अधिकारी मुंबई पश्चिम यांचे समक्ष वनपरीक्षेत्र अधिकारी, पश्चिम मुंबई, मुंबई कांदळवन संधारण घटक यांचेकडे आहे त्या परीस्थितीत हस्तांतरीत केल्याचे संदर्भ क्र.5 अन्वये दिसुन येते.

कांदळवनाचे संरक्षण होणेसाठी मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. 87/2006 दि.17/09/2018 मध्ये खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहे.

- All mangrove areas irrespective of its area fall in CRZ-1 as per CRZ notifications of 1991 and 2011.
- Regardless of ownership of land having mangroves and area of the land all constructions within 50 m. on all sides of mangroves shall be stopped. The 50 m. area shall be free of construction except construction of compound wall / fencing for its protection.

CamScanner

CRZ Notification of 2011 मध्ये कांदळवन क्षेत्र CRZ-I क्षेत्रामध्ये समाविष्ठ केले असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

- In case mangrove area is more than 1000 sq.mt. a buffer of 50 m. along the mangroves shall be provided.
- For implementation and enforcement of this notification powers either original or delegated are available under Environmental (Protection) Act, 1986 with the MoEF, State Government or Union Territory Administration, NCZMA and SCZMA.

कांदळवनालगत 50 मी. बफर झोनचे क्षेत्र वन जमिन नसल्यामुळे कार्यवाही करावयाची असेल त्या ठिकाणी पर्यावरण संरक्षण कायदा लागु होतो. त्या कायद्या अंतर्गत Section 19 मध्ये स्पष्ट केले आहे की,

No court shall take cognizance of any offense under the act except on a compliant made by:

- Central Government or any Authority or Officer authorized in its behalf by the Government.

तसेच Environmental (Protection) Act, 1986 मध्ये कार्यवाही करणेकरीता खालीलप्रमाणे अधिकारी प्राधिकृत आहेत.

1. Government of the State (represented by the Secretary to the State Government incharge) of Environment.
2. The Chairman or Member Secretary of the State Pollution Control Board.
3. District Collector.
4. Regional Officers of the State Pollution Control Board.

पर्यावरण आणि हवामान बदल विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. 1 व 2 अन्वये सचिव, पर्यावरण आणि हवामान बदल विभाग, नवी दिल्ली यांना वन विभागाचे अधिकारी यांना Section 19 of Environmental (Protection) Act, 1986 मध्ये कार्यवाही करणेकरीता अधिकार देणेबाबत पत्र पाठविले होते. त्यानुसार मा. मंत्री, पर्यावरण आणि हवामान बदल विभाग, मा.श्री. प्रकाश जावडेकर यांनी संदर्भ क्र.3 अन्वये व मा. श्री. भूपेन्द्र यादव यांनी संदर्भ क्र. 4 अन्वये हे उचित राहणार नाही असे कळविले असल्याचे दिसुन येते.

वरील वस्तुस्थिती पहाता बफर झोन क्षेत्रामध्ये हा विभाग कार्यवाही करु शकत नाही. तरी या विभागाकडे ताब्यात दिलेले 50 मी. बफर झोन क्षेत्र परत आपल्या विभागाच्या ताब्यात देणेबाबत मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी संदर्भ क्र. 6 अन्वये आदेशीत केले आहे. त्याअनुषंगाने सदर क्षेत्र आपल्या विभागाच्या ताब्यात घेणेबाबत आपले अधिनस्त तहसिलदार यांना आपले स्तरावरुन कळविण्यात यावे. जेणे करुन विषयांकित क्षेत्र हे राखीव वन अथवा संरक्षित वन म्हणुन अधिसुचित करण्यात आलेले नसल्यामुळे भविष्यात अतिक्रमण झाल्यास वन विभागामार्फत वन अधिनियमानुसार कार्यवाही करण्याकरीता अडचणी / अडथळा निर्माण होऊ शकतात.

(एम.आदर्श रेड्डी)
विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक

प्रतिलिपी — मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

CS CamScanner

## पंचनामा

दि- 17/07/2023

आम्ही खालील नाम करणारे पंचलोक कारणे लिहून देतो की आम्ही समक्ष हजर राहून सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो की, मौजे - चारकोप, सेक्टर - 8, सन राईज बिल्डींग च्या मागे कांदळवन परिसरात अतिक्रमण होत असलेबाबत तक्रारदार श्री राहुल मोरे तक्रार केली आहे. त्याअनुषंगाने वन परिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र क्र. अ.प. मुंबई / स्थळपाहणी / 215 / 2023-24 बोरिवली दि. 08/07/2023 नुसार संयुक्त स्थळपाहणी आयोजित केली असुन सदर स्थळपाहणीस वनपाल बोरिवली, मंडळ अधिकारी बोरिवली, तलाठी कांदिवली आणि परिरक्षण भुमापक हे उपस्थित आहेत. तक्रारदार श्री. राहुल मोरे यांना वनपाल बोरिवली यांनी भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधला असता ते स्थळपाहणीस उपस्थित राहु शकत नसलेबाबत कळविले. त्यामुळे त्यांचे अनुपस्थित स्थळ पहाणी केली असता सदरची जागा ही मौजे चारकोप येथील स.क्र. 39, न.भु.क्र. 4 या शासकीय मिळकतीपैकी आहे. सदर मिळकतीवर कांदळवनालगत अंदाजे 20 ते 25 कच्च्या स्वरुपाच्या झोपड्या दिसुन आल्या आहेत. सदर जागेवर स्थळपहाणीदरम्यान कोठेही कांदळवनाची तोड किंवा जागेवर नव्याने भरणी झाल्याचे दिसुन आले नाही. पाहणीदरम्यान वनपाल बोरिवली यांनी जागेचे GPS रिडींग घेतले असुन ते पुढीलप्रमाणे आहेत. 1) N - 19124286 E - 7249 03.92 2) N - 191243 42 E - 724902-87

वरील प्रमाणे सर्व माहिती खरी आहे. सदरचा पंचनामा वाचुन स्वाक्षरी केली असे

समक्ष

पंचलोक

1) गोरख शंकर च्यौरे
वय - 38 वर्षे

2) अजय गणपत पिळणकर
वय 37 वर्षे

मं. अ. बोरिवली

तलाठी कांदिवली

परिरक्षण भुमापक

नभूअ बोरिवली

FIR दाखल करण्यासाठी मूळ पंचनामा मिळाला

17/8/23

मं. अ. बो.